## स्थायी समिती सभा दिनांक ०८.०७.२०१५ रोजीचे कार्यवृत्त

### भाग-१

जिल्हा परिषद, स्थायी समिती सभा डॉ. पंजाबराव देशमुख सभागृह, जिल्हा परिषद, अमरावती येथे दिनांक ०८.०७.२०१५ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजित करण्यात आली. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, अमरावती यांनी सन्मा. उपाध्यक्ष श्री. सतीश हाडोळे, सन्मा. सभापती, बांधकाम व शिक्षण श्री. गिरीष कराळे, सन्मा. सभापती कृषी व पशुसंवर्धन सौ. अरुणाताई गोरले, सन्मा. सभापती समाजकल्याण सौ. सरीताताई मकेश्वर तसेच सन्मा. स्थायी समिती सदस्य, सचिव तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा), खाते प्रमुख व पत्रकार यांचे सभेच्या उपस्थिती निमित्ताने स्वागत केले व सचिव यांना सभा सुरु करण्यास अनुमती दिली.

**विषय क्रमांक १ :- दि.१२ जुन २०१५ रोजी संपन्न झालेल्या जि.प. स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त भाग-१ वाचुन कायम करणेबाबतच्या विषयावर खालीलप्रमाणे सभागृहामध्ये चर्चा होऊन सर्वानुमते मंजुरात प्रदान करण्यात आली.**

**मा.श्री. अभिजीत ढेपे, सदस्य :-** मागील सभेत झालेल्या चर्चेनुसार ई वर्ग जमीन हर्रासाचा निधी हा पंचायत समिती स्तरावर पडुन आहे. हा निधी खर्च करतांनी संबधित मुख्याध्यापकांना विश्वासात घेऊन खर्च करणे आवश्यक आहे असे इतिवृत्तात नमुद आहे. तरी हा निधी खर्च करतांनी संबंधित ग्राम शिक्षण समितीला विश्वासात घेऊन खर्च करण्यात यावा अशी दुरुस्ती इतिवृत्तात करण्यात यावी.

**सचिव :-** सन्मा सदस्य श्री. अभिजीतभाऊ ढेपे यांनी सुचविल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यात येईल.

**मा.श्री. सुधीर सुर्यवंशी, सदस्य :-** सध्या शाळेतील प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना रहिवाशी दाखल्यांची आवश्यकता आहे. परंतु ग्रामसेवक यांचे काम बंद आंदोलन असल्यामुळे विद्यार्थी यापासुन वंचित राहत आहेत. म्हणुन गामीण पातळीवरील विद्यार्थ्यांना दाखले मिळण्याबाबत त्यांचे अधिकार दुसऱ्याला देऊन पर्यायी व्यवस्था करण्याबाबत प्रशासन काय कार्यवाही करणार याबाबत माहिती देण्यात यावी.

**सचिव :-** मा.मु.का.अ. यांचे पत्र क्रमांक जिप/पंचा/आस्था-३/५५८९/१५, दि. ०४.०७.२०१५ नुसार पंचायत समिती स्तरावरील कार्यरत सर्व विस्तार अधिकारी, संपावर नसलेले ग्रामसेवक व कंत्राटी ग्रामसेवक यांना सम प्रमाणात ग्रामपंचायती देवुन ग्रामीण भागातील ग्रामीण पातळीवरील शेतकरी, विद्यार्थी, नागरीकांचे दैनंदिन आवश्यक कामाकरीता दाखले उदा.जन्मदाखले, मृत्यु दाखले, नमुना-८ शौचालय, शैक्षणिक कामाकरीता दाखले तालुकास्तरावरील संग्राम कक्ष व ग्रामपंचायत स्तरावरील असलेले संग्रामकक्षा मार्फत तपासुन दाखले पुरविण्याची कार्यवाही करण्याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) यांना आदेशीत करण्यात आले आहे.

**मा.श्री. सुधीर सुर्यवंशी, सदस्य :-** कोणत्या ग्रामसेवकांना कोणती व किती गावे दिली याबाबतची यादी सन्मा सदस्यांना व वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी म्हणजे विद्यार्थ्यांना होणार त्रास व वेळ वाचेल.

**मा.श्री. अभिजीत ढेपे, सदस्य :-** आजच्या सभेला गैरहजर असलेल्या अधिकाऱ्यांनी मा. अध्यक्ष यांची परवानगी घेतली काय? ते सांगावे?

**मा. अध्यक्ष :-** बऱ्याचशा अधिकाऱ्यांनी आजचे सभेच्या अनुपस्थितीबाबत माझी परवानगी घेतली आहे.

**मा.श्री. अभिजीत ढेपे, सदस्य :-** ज्या ज्या अधिकाऱ्यांना आजच्या सभेला उपस्थित राहण्याबाबत नोटीसेस दिल्या आहेत ते अधिकारी आजच्या सभेला हजर आहेत काय? याची तपासणी करण्यात यावी.

**सचिव :-** गट विकास अधिकारी, धारणी व चिखलदारा हे नवसंजीवनीची बैठक असल्यामुळे अनुपस्थित आहेत व उप मु.का.अ.(नरेगा) हे कार्यशाळेकरीता गेले आहेत तसेच इतर सर्व अधिकारी हजर आहेत.

**मा.श्री. अभिजीत ढेपे, सदस्य :-** विभागीय आगार नियंत्रक, राज्य परिवहन मंडळ, अमरावती हे हजर आहेत काय?

**सचिव :-** विभागीय आगार नियंत्रक, राज्य परिवहन मंडळ, अमरावती हे हजर नाहीत.

**मा. अध्यक्ष :-** जिल्हा परिषदे व्यतिरिक्त इतर विभागाचे अधिकारी ज्यांना या सभेच्या नोटीसेस देण्यात आलेल्या आहेत परंतु आजच्या सभेला उपस्थित नाहीत अशा अधिकाऱ्यांना अनुपस्थितीबाबत पत्र देण्यात यावे व पुढील सभेपासुन नियमितरित्या या सभेला उपस्थित राहण्याबाबत सुचना देण्यात याव्या.

**मा.श्री. सुधीर सुर्यवंशी, सदस्य :-** नवसंजीवनीच्या बैठकीकरीता मा. सभापती, आरोग्य, जि.प. अमरावती व संबंधित जिल्हा परिषदेचे सन्मा. सदस्यांना बोलाविण्यात येत होते. परंतु आता मा. जिल्हाधिकारी यांचेकडुन का बोलाविण्यात येत नाही? ग्रामीण भागातील कामांबाबत ही बैठक असते त्यामुळे ही आमच्या अधिकारांवर गदा आहे.

**मा.श्री. अनिरुध्द उर्फ बबलुभाऊ देशमुख, सदस्य :-** सन्मा. सदस्य श्री. सुधीर सुर्यवंशी यांनी सुचविल्याप्रमाणे नवसंजीवनीच्या बैठकीकरीता मा. सभापती, आरोग्य, जि.प. अमरावती व संबंधित जिल्हा परिषदेचे सन्मा. सदस्यांना बोलाविण्याबाबत आजचे सभेचा ठराव घेऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**मा.अध्यक्ष :-** सन्मा. सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे नवसंजीवनीच्या बैठकीकरीता मा. सभापती, आरोग्य, जि.प. अमरावती व संबंधित जिल्हा परिषदेचे सन्मा. सदस्यांना बोलाविण्याबाबत आजचे सभेचा ठराव घेऊन मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे पुढील कार्यवाही करीता पाठविण्यात यावा.

**मा.श्री. अनिरुध्द उर्फ बबलुभाऊ देशमुख, सदस्य :-** कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि.प. अमरावती हे हजर आहेत काय?

**उप का.अ.(बांधकाम) :-** कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि.प. अमरावती यांचे डोळयाचे ऑपरेशन झाल्यामुळे ते रजेवर आहेत.

**<u>मा.श्री. अनिरुध्द उर्फ बबलुभाऊ देशमुख, सदस्य</u> :-** श्री. ठाकरे, उप अभियंता (बांधकाम) यांचेबाबतचा विषय पुढील सभेत ठेवण्यात यावा. मागील सभेत कार्यकारी अभियंता (बांधकाम) हे उपस्थित नसल्यामुळे याबाबतची माहिती मिळु शकली नाही. तेव्हा दर्यापुर अंतर्गत पुरहाणी दुरुस्तीची प्रत्येक कामाची कामनिहाय पाहणी करुन कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, अमरावती यांनी अहवाल सादर करावा.

**<u>मा.श्री. रविंद्र मुंदे, सदस्य</u> :-** मागील सभेत झालेल्या चर्चेप्रमाणे रामकिशोर ॲन्ड सन्स व संजय कंन्स्ट्रक्शन यांचेकडे जिल्हा परिषदेची बांधकामे प्रलंबीत असल्याबाबत काम निहाय अहवाल मागविण्यात आला होता ती माहिती का सादर करण्यात आली नाही?

**<u>मा. उपाध्यक्ष</u> :-** १३ व्या वित्त आयोगाच्या निधी अंतर्गत खोडगांव ते अंजनगांव रस्त्याचे काम मंजुर आहे. परंतु सदर काम ज्या यंत्रणेने घेतले ते जास्त कमी दराने घेतले आहे व सद्यस्थितीत त्यायंत्रणेकडे जिल्हयातील कामे अपुर्ण आहेत. करीता सदर कामे recall करण्यात यावे.

**<u>उप का.अ.(बां)</u> :-** सदर कामे recall करता येईल.

**<u>मा.श्री. सुधीर सुर्यवंशी, सदस्य</u> :-** संजय कंन्स्ट्रक्शन यांचेकडे पंचायत समिती, तिवसाचे काम प्रलंबीत असतांना त्यांना जिल्हा परिषदेचे दुसरे काम कसे देण्यात येते? याबाबत माहिती देण्यात यावी.

**<u>उप का.अ.(बां)</u> :-** संजय कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन पंचायत समिती, तिवसाचे काम करारनाम्यानुसार पुर्ण झालेले असुन इमारत पंचायत समितीला हस्तांतरीत करण्यात आली असुन त्या इमारतीमध्ये कर्मचारी वर्ग बसत असुन कामे करीत आहेत. सदर कामाच्या विलंब (delay) बाबत या कंपनीला दंड आकारण्यात आला आहे.

**<u>मा.श्री. सुधीर सुर्यवंशी, सदस्य</u> :-** संजय कंन्स्ट्रक्शन कंपनीला तिवसा पंचायत समितीच्या कामाच्या विलंबाबाबत दंड (recovery) आकारण्यात आली असतांना दुसरी कामे कशी काय देण्यात येत आहेत?

**<u>मा.श्री. अभिजीत ढेपे, सदस्य</u> :-** १३ व्या केंद्रीय वित्त आयोगाचा हा निधी आहे. हा जर मर्यादीत कालावधीत खर्च झाला नाही तर हा निधी परत जाईल. म्हणुन या विषयाबाबत निर्णय होणे आवश्यक आहे.

**<u>उप का.अ.(बां)</u> :-** हा निधी सप्टेंबर पर्यंत खर्च करावयाचा आहे.

**<u>मा.उपाध्यक्ष</u> :-** या कामाची निविदा recall करता येत असेल तर तशी याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**<u>मा.श्री. अनिरुध्द उर्फ बबलुभाऊ देशमुख, सदस्य</u> :-** या कामाची निविदा recall करता येते काय? मा. अध्यक्ष यांचेशी चर्चा करुन कायदेशीर बाबी तपासुन या कामाची निविदा recall करता येत असेल तर तसे करावे. रामकिशोर ॲन्ड सन्स् व संजय कंन्स्ट्रक्शनला जिल्हयात किती कामे दिली? ही कामे कधी देण्यात आली? त्या कामांची सद्यस्थिती काय आहे? याची माहिती पुढील सभेत लेखी सादर करण्यात यावी. जेणेकरुन याबाबत पुढील निर्णय घेता येईल.